महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. च्या हद्दीत येणा-या १९०० ले आऊटमध्ये स्थानिक नगरसेवकांना विकास कामे करण्याचे अधिकार नसल्याबाबत

(१) १३७५ (२३-१२-२०१४). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. च्या हद्दीत येणा-या १९०० ले आऊटमध्ये स्थानिक नगरसेवकांना विकास कामे करण्याचे अधिकार नसल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे हजारो नागरिक विकासापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरसेवकांना या लेआऊटस् मध्ये विकास कामे करण्याचा अधिकार देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०२/२००८ रोजी मा.श्री.नितीन गडकरी, यांनी याबाबत मा,मुख्यमंत्री यांना पत्र लिहीले आहे.

(२) अनधिकृत अभिन्यासामध्ये होणारी विकास कामे ही तेथून जमा होणाऱ्या रु.१६/- प्रति चौ.फूट या दराने आकारण्यात येणाऱ्या विकास शुल्काच्या निधीच्या मर्यादेत करण्यात येतात. तसेच यासोबत जेएनएनयुआरएम, खासदार, आमदार निधी इ. निधीचा देखील वापर करुन विकास कामे पूर्ण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

(३) उक्त प्रश्न भाग-१ मधील पत्राच्या अनुषंगाने, "ज्या नगरसेवकांचा प्रभाग अनधिकृत ले-आऊटने व्यापलेला आहे त्यांच्या भागात ले-आऊटचे नियमितीकरण व तेथील विकास कामे अग्रक्रमाने हाती घेवून पूर्ण करण्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासला दिनांक ३१/१२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे."

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा नगरपरिषद इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देणेबाबत

(२) १५८० (०७-०४-२०१५). डॉ.पंकज भोयर (वर्धा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील नगरपरिषदेची जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे, जुनी इमारत पाडल्यामुळे नगरपरिषदेचा कारभार निधी उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या स्वरुपाच्या इमारतीत १० वर्षापासून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा नगरपरिषदेकरीता इमारत निधी केव्हा उपलब्ध होईल,

(३) तसेच, बांधकाम पुर्ण होऊन नगरपरिषदेची नवीन इमारत केव्हा सुरू होणे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) होय हे खरे आहे.

(२) व (३) वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरीता रु.२.५० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर निधी मधून सदरचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा रखडल्याबाबत

(३) २०८१ (२३-१२-२०१४). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेचा विकास आराखडा गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडयाअंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करुन पन्हाळा पर्यटन मार्गदर्शन केंद्र इमारत बांधून वापराविना पडून आहे, हे खरे आहे का,

(३) असल्यास, या ठिकाणी जंगल माहिती केंद्र, प्रतिक्षालय, व्यायामशाळा, इन डोअर गेम्स, तात्पुरते तंबू निवास, पार्कीग व्यवस्था, वन्य प्राण्यापासून संरक्षण भिंत व लॅन्ड स्केपिंग आदी सुविधासह रखडलेल्या पर्यटन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली किंवा करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. शासनाने दि.२६/०३/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये पन्हाळा गिरीस्थान नगरपालिकेच्या विकास योजनेस भागश: क्षेत्रासाठी मंजूरी दिली असून उर्वरित वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने दि.१५/०१/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर केली आहे.

(२) पन्हाळा पर्यटक मार्गदर्शक केंद्र या इमारतीचे बांधकाम केंद्र पुरस्कृत योजना आर्थिक वर्ष २००६-०७ अंतर्गत कोल्हापूर परिसराचा एकात्मिक विकास करणेसाठी केंद्र शासनाकडून सन २००६ मध्ये मंजूरी देऊन निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वर्ग करण्यात आला होता.

पन्हाळा येथील (सि.स.नं.६३५(रि.स.नं.८अ) पैकी सुमारे ६५०० चौ.मी.) ही सरकारी मुलकी पड प्लॅटेशन वहिवाट फॉरेस्ट खाते यांचे नावावर असून सदर जागा महामंडळाच्या नावावर हस्तांतरीत करणेकामी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे. सदर जागा महामंडळाच्या नावे हस्तांतरीत झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) सदर बाबी पन्हाळा पर्यटक मार्गदर्शक केंद्राच्या कामामध्ये अंतर्भूत नाहीत.

ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात सन २००९ पासून घोडबंदर आणि सेंटर पाडा येथे RMC प्लँट सुरु असल्याबाबत

(४) ३१८० (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात सन २००९ पासून घोडबंदर आणि सेंटर पाडा येथे RMC प्लँट सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लँटला पर्यावरण विभागाची परवानगी आहे काय,

(३) तसेच सदर RMC प्लँटच्या आजुबाजुच्या नागरिकांना प्रदुषण, खराब रस्ते आणि दुषित पाणी यांचा वारंवार त्रास सहन करावा लागतो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यवाही केली आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर या गावाच्या हद्दीमध्ये सन २००९ पासून RMC प्लँट सुरु ओत.

मात्र सेंटर पाडा या गावाचा मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समावेश नसल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) घोडबंदर गावातील RMC प्लँटला पर्यावरण विभागाची परवानगी प्राप्त असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील सिडको भागातील एन - ६ येथील शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेल्या जागेत अनधिकृतरित्या अतिक्रमण करुन चिस्तीया नावाची वसाहत स्थापन करण्यात आल्याबाबत

(५) ३७३५ (२३-१२-२०१४). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सिडको भागातील एन - ६ येथील शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेल्या जागापैकी जवळपास निम्म्या जागेवर कांही लोकांनी अनधिकृतरित्या अतिक्रमण करुन चिस्तीया नावाची वसाहत स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिक्रमण हटविण्याबाबत संस्थेने तसेच कन्नड जि.औरंगाबाद येथील लोकप्रतिनिधींनी गेल्या २ वर्षाच्या कालावधीत अनेक वेळा मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद, सिडकोचे औरंगाबाद येथील अधिकारी, मा.मुख्यमंत्री यांचेकडे तक्रारी केल्या आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) विषयांकित संदर्भात संस्थेस वाटप अतिरिक्त जागेवर अन्य त्रयस्थ लोकांची अतिक्रमणे होत असल्याचे तक्रार अर्ज शिवज्योती संस्थेमार्फत, लोकप्रतिनिधी मार्फत प्राप्त झालेले आहेत.
(३) या संदर्भात सिडकोतर्फे चौकशी करण्यात आलेली आहे. शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्थेस वाटप अतिरिक्त जागेचची किंमत विहित मुदतीत भरणा न केल्यामुळे जागेचे वाटप दिनांक ३१.३.१९९५ रोजी रद्द करण्यात आलेले आहे. या विरोधात संस्थेने न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सद्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयीन निर्णयानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

राज्यात प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना प्रकल्पपूर्तीचा कालावधी घालणे बंधनकारक केल्याबाबत

(६) ७३९३ (०७-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरेशी आर्थिक तरतुद नसतांना राज्यात हजारो कोटी रुपयांच्या योजना वा प्रकल्पांना सरसकट प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे योजना वेळेत पूर्ण होत नाहीत आणि प्रकल्पांची किंमत मात्र वाढतच जाते यासाठी अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने प्रकल्पाला वा योजनेला मान्यता देण्यासाठी प्रकल्पपूर्तीची तारीख निश्चित करण्याचे बंधन घातले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) ते (३) प्रश्न भाग-१ मध्ये उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.विअपक्र/क्र.क्र.४९/१४/विनियम, दिनांक ०५ जानेवारी, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेच्या आदेशासाठी नमुना विहित केला असून

त्यानुसार कामाची सुरुवात होण्याचे वर्ष, प्रस्तावित कामाचे वर्षनिहाय नियोजन, सुरु असलेल्या कामाचा वित्तीय तपशिल अशी माहिती प्रशासकिय मान्यतेच्या आदेशात नमूद करणे आवश्यक आहे.

(२) व (३) नगर विकास विभागांतर्गत राबविण्यात येणारे मेट्रो रेल्वे, मोनोरेल्वे या सारखे सार्वजकि जलद नागरी वाहतूक विषयक मोठे प्रकल्प हे या प्रकल्पंचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेऊन त्यानुसार आवश्यक त्या मान्यता घेऊन राबविण्यात येतात. अशा सविस्तर प्रकल्प अवालामध्ये प्रकल्प पूर्णत्वाचा अपेक्षित कालावधी तसेच प्रकल्पाचे वार्षिक वित्तीय नियोजन याची माहिती नमूद करण्यात येते.

मालवण नगरपालिकेचा भुयारी गटार प्रकल्प गेली चार वर्षे रखडला असल्याबाबत

(७) ७९९५ (०६-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण नगरपालिकेच्या नियोजन शुन्य कारभारामुळे शहरातील बहुचर्चित भुयारी गटार प्रकल्प गेली चार वर्षे रखडला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प रखडल्यामुळे शहरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) असल्यास, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) मालवण नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजने अंतर्गत सद्यस्थितीत पाईप लेयिंग, चेंबर्स, प्रॉपर्टी कंनेक्शनची बहुतांशी कामे पूर्ण झाली आहेत. पंपिग स्टेशन एस.टी.पी.ची कामे अनुक्रमे २० टक्के व २५ टक्के झालेली आहेत.

(२) या योजनेच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण सरु करण्यात आलेले असून सुमारे १५ किमी रस्ते पूर्ण करण्यात आलेले आहेत उर्वरीत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे मालवण नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अभियान संपुष्टात आल्यामुळे सदर प्रकल्पासाठी आता केंद्र शरासनाकडून निधी उपलब्ध होणार नसलेने सदर प्रकल्प नगरपरिषदने त्यांच्या निधीतून पूर्ण करणे अभिप्रेत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण-कसाल (जि.सिंधुदुर्ग) राज्य मार्गावरील देऊळवाडा येथील मंदिर अतिक्रमण करुन बांधल्याबाबत

(८) ८०१४ (०८-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण-कसाल (जि.सिंधुदुर्ग) राज्य मार्गावरील देऊळवाडा येथील ३५० वर्षापूर्वीचे मंदिर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत अतिक्रमण करुन बांधल्याने ते तात्काळ तोडावे असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी मालवण नगरपरिषदेला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार मालवण नगरपरिषदेचे कर्मचारी हे मंदिर तोडण्यासाठी गेले असता स्थानिक नागरिकांनी मंदिर तोडण्यास विरोध करुन आक्रमण भूमिका घेऊन त्याठिकाणी ठिय्या आंदोलन केल्यामुळे सुमारे साडेतीन तास या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) होय,

अतिक्रमण केलेला भाग काढून टाकण्यात आला आहे.

(२) पोलीस विभागाकडून वाहतूकीचे योग्य ते नियोजन करण्यात आल्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) मुरुम नगरपरिषदेचा हद्दवाढीचा प्रस्तावाबाबत.

(९) ९९५६ (०६-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) मुरुम नगरपरिषदेचा हद्दवाढीचा प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद यांनी संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेली माहिती सविस्तर नसल्याने सदरची माहिती विविध प्रपत्रात पाठविणेबाबत मा.उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी जि.प. उस्मानाबाद या कार्यालयास दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी सुचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती भुयारी गटार योजना करण्याबाबत

(१०) १०२९७ (०७-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती भुयारी गटार योजना टप्पा-१ कार्यान्वीत करण्याकरीता रु.२८५२.५० लक्ष किमतीचा प्रस्ताव दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावानुसार मागणी करण्यात आलेला निधी महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अंतर्गत मंजूर अमरावती भुयारी गटार प्रकल्प व त्यांची संलग्न काम पूर्ण करण्यंसाठी शासनाने रु.२४.७५ कोटी इतका निधी मंजूर केला असून, त्यापैकी प्रथम हप्त्याचा निधी रु.१२.३८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

चिखली (जि. बुलडाणा) नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे क्रमांक ९८ मधील आरक्षण वगळण्याबाबत

(११) १०३८५ (०६-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि. बुलडाणा) नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे क्रमांक ९८ मध्ये गेल्या कित्येक वर्षापासून अनेक कुटुंबे रहिवासी असून सदर जागेत आरक्षण असल्याने नगरपरिषदेने आरक्षण क्रमांक ७२ व १७ वगळण्यासाठी रितसर प्रस्ताव माहे नोव्हेंबर २०१३ रोजी अथवा त्या सुमारास शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेत सर्व्हे नंबर ९८ मध्ये आरक्षण वगळून रहिवासी क्षेत्रात न केल्याने तेथील कुटुंब मुलभुत सुविधा पासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चिखली नगरपरिषद हद्दीतील येथील शेत सर्व्हे ९८ मधील आरक्षण वगळण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्याने विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :(१) आरक्षण क्र.७२ व १७ वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकरिता नगरपरिषदेने (क्र.२८८३/२०१३) दिनांक २५.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(२) ते (४) या प्रकरणी नगररचनाकार, बुलढाणा यांनी दिनांक १२.१२.२०१३ चे पत्र (क्र. फेरबदल/चिखली/आ.क्र.७२ व १७/नरबु/१७४८) अन्वये नगरपरिषदेकडून माहिती अपेक्षित आहे. ती अद्याप नगरपरिषदेकडून प्राप्त झालेली नाही.

मढ ते मालाड (मुंबई) च्या मार्वे रस्त्यावर नादुरुस्त व अपुरी सिग्नल व्यवस्था असल्यामुळे मोठया प्रमाणावर अपघात होत असल्याबाबत

(१२) ११९८३ (०७-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मढ ते मालाड (मुंबई) च्या मार्वे रस्त्यावर नादुरुस्त व अपुरी सिग्नल व्यवस्था असल्यामुळे तसेच सदरहू रस्ता अरुंद असल्याने येथे मोठया प्रमाणावर अपघात होऊन अनेकजण मृत्युमुखी पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम गेल्या ४ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे व सिग्नल यंत्रणेचे आधुनिकीकरण त्वरीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. मढ ते मालाड (मुंबई) च्या मार्वे रस्त्यावर दोन ठिकाणी सिग्नल यंत्रणा असून ती व्यवस्थितरित्या कार्यरत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. नाझनीन अपार्टमेंटपासून मालवणी चर्चपर्यंत रस्ता रुंदीकरणाने बाधित जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेतल्यावर रस्ता रुंदीकरणाचे काम महापालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

तसेच अग्निशमन केंद्र ते नाझनीन अपार्टमेंट, मालवणी मालाड (पश्चिम) व सेंट अेन्थोनी चर्च येथील रस्ता रुंदीकरणाने बाधित जागा महापालिकेने ताब्यात घेतल्यावर रस्ता रुंदीकरणाचे काम महापालिकेमार्फत हाती घेण्यात येईल.

(३) संपूर्ण मुंबई शहरातील वाहतूक समस्या व व्यवस्थापनासाठी सर्व समावेशक अभ्यास अहवाल तयार करुन व वाहतूक व्यवस्थापन/वाहतूक समस्येविषयीची व्यवहार्यता/शक्यता पडताळून पुढील योग्य ती कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या शहरात आठवडा बाजारात व्यवसाय करणाऱ्या या सुशिक्षित बेरोजगाराबाबत

(१३) १३७८१ (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या शहरात आठवडी बाजारात काही बेरोजगार सुशिक्षित युवक खोकी टाकून व्यवसाय करणाऱ्या या सुशिक्षित बेरोजगार गेल्या २० ते २५ वर्षापासून व्यवसाय करीत असून नगरपालिकेचे भाडे व कर भरीत असून त्यांच्या या खोक्याचा वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा होत नसतांनाही चप्पल लाईनला नगरपालिकेने मान्यता देऊन गाळे बांधुन स्वत: मंत्री महोदयांनी गाळ्याचे उद्घाटन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरीही अतिक्रमण ठरवून सदरहू गाळे तोडण्यात आल्याने त्यांचे संसार रस्त्यावर आले असल्यामुळे त्यांना व्यवसायासाठी नगरपालिकेने मोकळ्या जागा देण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसाय करण्यासाठी नगरपालिकेने इतरत्र मोकळी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) चप्पल लाईन रस्त्यावरील गाळे बांधण्यास नगरपरिषदेने मान्यता दिलेली नाही.

(२) व (३) मा.न्यायालयाच्य आदेशानुसार सदर गाळ्यांचे अतिक्रमण काढून टाकण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील मिरज येथील विविध कामाबाबत

(१४) १४०८७ (०७-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील मिरज येथील १) डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, २) महात्मा गांधी उद्यान, ३) महात्मा बसवेश्वर उद्यान, ४) महात्मा फुले उद्यान, ५) जिजामात उद्यान, ६) रुंगठा उद्यान, ७) रमा उद्यान आदी उद्याने मुलभूत सुविधापासून वंचित राहिलेली आहेत त्याठिकाणी वॉल कंपाऊंड बांधणे, पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, बगीच्या तयार करणे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी मिरज यांनी नगर विकास विभागाकडे कपात सूचना क्र. ४३ अन्वये मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मिरज येथील १) महात्मा गांधी चौक ते शास्त्री चौक (नदीवेस), २) मिरज पोलीस स्टेशन-आंबेडकर उद्यान-परमशेट्टी हॉस्पिटल रस्ता, ३) डॉ.गाडवे चौक ते बस स्टँड-वखार भाग रस्ता करणेसाठी मा.लोकप्रतिनिधी मिरज यांनी नगर विकास विभागाकडे कपात सूचना क्र.४० अन्वये मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर उद्यानाच्या व रस्त्याच्या विकासासाठी निधी मिळून कामे पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) व (२) याबाबत उद्यान दुरुस्तीबाबत नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रस्ताव प्राप्त करण्यात येत आहे. तसेच. रस्त्याबाबत निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यानुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगर क्षेत्र विकास नियोजनांचा आराखडयाबाबत

(१५) १४५६५ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगर क्षेत्र विकास नियोजनांचा आराखडा, याबाबतची अनिश्चितता, महानगर नियोजन समिती व नागपूर प्रन्यासची वैधानिक अस्पष्टता कायम असतांनाही नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, महानगर क्षेत्रातील नगर परिषदेतील विकास कामे, विकास प्रकल्प, संकुले, भुखंडाचे नियमितीकरण याबाबतचे नियमन करुन महसूल गोळा केल्या जात आहे, याबाबतचे ग्रामपंचायतचे नियमन अवैध ठरते काय,

(२) असल्यास, नागपूर महानगर क्षेत्रातील ग्रामपंचायत, नगरपरिषद इत्यादींच्या संविधानिक जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने ग्रामपंचायत व नागपूर सुधार प्रन्यास यामध्ये निर्माण झालेल्या संघर्ष व तणावाला कोण जबाबदार आहे,

(३) महाराष्ट्रातील पुणे, मुंबई व इतर महानगरपालिका किंवा महानगरक्षेत्रात अशाप्रकारे व्यवस्था नसताना फक्त नागपूर जिल्ह्यातच अश्याप्रकारे गोधळांची दुटप्पी भुमिका असल्याचे कारण काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :(१) महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) अध्यादेश, १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने दिनांक २३.०७.१९९९ अन्वये नागपूर शहर व त्याबाहेरील विशिष्ठ क्षेत्र, "नागपूर महनगर क्षेत्र" घोषित केले असून, दि.३०.१२.२०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नागपूर महानगर क्षेत्राकरिता महानगर नियोजन समिती नव्याने गठित करण्यात आलेली आहे.

शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम-४०(१) अन्वये दि.३१.०८.२०१० रोजीचे अधिसूचनेद्वारे नारपूर सुधार प्रन्यासची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केलेली आहे.

नागपूर महानगर क्षेत्राच्या सुनियोजित विकासासाठी शासनाने दि.२३.१२.२०१४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधि.१९६६ चे कलम ४२(क) अन्वये उक्त क्षेत्र हे "विकास क्षेत्र" म्हणून घोषित केलेले असून, अधिनियमाच्या कलम ४२(घ) अन्वये या विकास क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यासला "क्षेत्र विकास प्राधिकरण" म्हणून नियुत केलेले आहे.

नागपूर महानगर नियेजन प्राधिकरणाचे जे कार्यक्षेत्र आहे, तेच कार्यक्षेत्र नागपूर सुधार प्रन्याससाठी अधिसुचित करण्यात आले असले तरी दोन्ही संस्थाचे कामकाज हे वेगवेगळ्या अधिनियमांद्वारे सुरु असल्यामुळे त्यांच्या कामाकजामध्ये वैधानिक अस्पष्टता असण्याचे कारण नाही.

शासनाने दि.३१.०८.२०१० रोजी कलम ४०(१) अन्वये नारपूर महानगर क्षेत्राकरिता नागपूर सुधार प्रन्यासाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे. त्यानुसार नागपूर महानगर क्षेत्रात कार्यरत असलेले कोणतेही नियोजन प्राधिकरण, विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नवनगर विकास प्राधिकरण यांचे असे कार्य संपुष्टात आले. त्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास भुखंडाचे नियमतीकरण करीता गोळा करत असलेला महसूल नियमानुसारच आहे. तसेच नागपूर महानगर क्षेत्रामधील ग्रामपंचायत यांचे गावठाणमधिल नियमन अवैध ठरत नाही.

(२) अधिनियमाच्या कलम ४०(१) अन्वये शासनाने नागपूर सुधार प्रन्यास यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले असल्याने ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमानुसार नियोजन प्राधिकरण्याची कार्ये व कर्तव्य पार पाडण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यास सक्षम आहे. नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातून नगर परिषद क्षेत्रे वगळली असल्याने, नगर परिषद क्षेत्रासाठी "नगर परिषद" ही स्वतंत्र नियोजन प्राधिकरण असल्याने त्यांचे अधिकार अबाधित आहेत.

(३) मुंबई महानगर प्रदेश अधिनियम १९७४ अन्वये मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाची (MMRDA) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाली आहे, पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व नागपूर प्राधिकरण क्षेत्र विकास प्राधिकरण ही प्राधिकरणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ अन्वये नियुक्त करण्यात आलेली असून, त्याठिकाणी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

नागपूर येथे उमरेड रोडवर मौजा हरपूर येथे स्पोर्टस कॉम्पलेक्स व स्टेडीयम असे क्रीडा संकुल बांधण्याबाबत

(१६) १४५८३ (०८-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे उमरेड रोडवर मौजा हरपूर येथे स्पोर्टस कॉम्पलेक्स व स्टेडीयम असे क्रीडा संकुल बांधण्याचा निर्णय कामगार कल्याण मंडळ व ना.सु.प्र.ने घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रीडा संकुलाचे बांधकाम व ५० टक्के पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, १० वर्षे उलटूनही उर्वरित बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कामाला विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४), (५) व (६) प्रस्तुत प्रश्नासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि.२५/०१*२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत :-
अ) युनीटी इंफ्रा प्रोजेक्ट यांच्याबरोबर करण्यात आलेला करारनामा Foreclose करुन उर्वरीत कामासाठी नव्याने निविदा मागवावी.
ब) उर्वरीत काम सध्याच्या DSR नुसार करण्यास युनिटी इंफ्रा प्रोजेक्ट तयार असल्यास त्यांच्याकडून करुन घेण्याची शक्यता तपासून पहावी.

पन्हाळा नगरपरिषदेच्या पर्यटन अनुदानात वाढ करणेबाबत

(१७) १४८०७ (०७-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील एक महत्वाचे ऐतिहासिक व पर्यटन स्थळ असलेल्या पन्हाळ गडाचा पर्यटन दृष्ट्या विकास होण्यासाठी शासनाने सन १९५४ मध्ये पन्हाळा नगरपरिषद ही खास बाब म्हणून गिरीस्थान नगरपरिषद स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९६१ पासून सदर नगरपरिषदेला १ लाख रुपये प्रतिवर्ष पर्यटन अनुदान दिले जाते, या अनुदानात वाढ होण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर अनेक वर्षे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पन्हाळा गडावर येणाऱ्या शिवप्रेमी, इतिहास प्रेमी व पर्यटकांना मुलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रतिवर्षी पन्हाळा नगरपरिषदेस रूपये ५ कोटी इतके अनुदान शासन देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रतिवर्षी एक लाख रुपये पर्यटन अनुदान देण्यात येते. सन २०१५-१६ करीता १.२२ लक्ष पर्यटन अनुदान देण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आकोट नगरपरिषदेअंतर्गत रखडलेल्या रस्त्याच्या कामाबाबत

(१८) १५४७३ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) शहर नगरपरिषदेअंतर्गत शहरातील २ कोटी १७ लक्ष रूपयांच्या रस्त्याची विकास कामे गेल्या काही महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभाग व नगर परिषद प्रशासनाचा दिरंगाईमुळे ही कामे रखडलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेअंतर्गत रस्ते विकास निधी खर्च करण्याचे अधिकार नसून नवीन शासकीय परिपत्रकानुसार यापुढे नगरपरिषदेची रस्ते विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करावे लागेल व त्यासाठी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांची (NOC) ना हरकत प्रमाणपत्र लागेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आकोट नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांनी २ कोटी १७ लक्ष रस्ते विकास कामाची (NOC) ना हरकत प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाला न दिल्याने आकोट शहराचे अंतर्गत रस्ते व चौकांच्या सौदर्यीकरणाचे कामे रखडलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपावेतो रखडलेली विकास कामे न झाल्याने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१), (२) व (३) आकोट नगरपरिषदेस शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर, २०१३ अन्वये अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असून, सदर कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांनी यापैकी कामांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली असून, आकोट नगरपरिषदेकडून सदर कामांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सूट देण्याबाबत

(१९) २१२७७ (१२-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेचा माजी सैनिकांना मालमत्ताकरात सूट देण्यासंबंधीचा प्रस्ताव नगर रचना विभागाकडे तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील सर्व नगरपरिषद व ग्रामपंचायत क्षेत्रातील सैनिकांचे घरावर लावण्यात येत असलेली घरपट्टी (टॅक्स) माफ करण्यात यावी किंवा विशेष बाब म्हणून सवलत देण्यात

यावी अशा मागणीचे निवेदन पाचोरा-भडगांव (जि.जळगांव) येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.नगरविकास राज्यमंत्री यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) नागपूर महानगरपालिकेच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्यास नागपूर महानगरपालिका सक्षम असल्याने, त्याबाबत दिनांक ३१/८/२०१५ च्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील नागरी भागात राहणाऱ्या व संरक्षण दलातील शौर्य पदक आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेस, मालमत्ता करातून सूट देण्याबाबत दिनांक ०५/०४/२०१६ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम २०१५ नुसार दिनांक ३१/१२/२०१५ च्या अधिसूचनेन्वये संरक्षण दलातील शौर्य पदक किंवा सेवापदक धारक व अशा पदक धारकांच्या विधवा किंवा अवलंबितांच्या वापरात आणल्या जाणाऱ्या फक्त एकच निवासी इमारतीस, करातून माफी देण्यात आलेली आहे.

रामटेक गडमंदिर, कालिदास स्मारक व ओम गार्डन परिसरात सोयीसुविधाबाबत

(२०) २२३८५ (११-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक गडमंदिर, कालिदास स्मारक व ओम गार्डन परिसरात नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे यात्रेकरु व नागरिकांना पर्याप्त सोयीसुविधा मिळत नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास संबंधित अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाहणीनुसार सदरच्या सोयीसुविधा पुरविण्यासंदर्भात तसेच साफसफाई संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) सदरच्या ठिकाणी नगरपरिषदेमार्फत विद्युतीकरण, पाणी पुरवठा व शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली असून नियमित साफसफाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे सुरु असणाऱ्या रस्त्याच्या ८०० मीटर खडीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२१) २३७८५ (१७-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथे सुरु असणाऱ्या रस्त्याच्या केवळ ८०० मीटर खडीकरणाच्या कामासाठी पावणेपाच कोटी खर्च करण्यात आले असून काम निकृष्ट प्रतीचे झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच दर्जेदार काम होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :(१) नाही.

(२) व (३) सदर रस्त्यांची शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर यांचेकडून पाहणी करण्यात आली आहे. पाहणीचे निष्कर्ष समाधानकारक असल्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(४) व (५) सदर प्रकल्पाच्या यापुढे होणाऱ्या कामाची देखील मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत तपासणी करणेबाबत सूचना देण्यात येत आहेत.

राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील अर्जुना नदीवर पुल बांधण्याबाबत

(२२) २६३५७ (०४-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील कोंढेतड परिसरातील अर्जुना नदीवर पुल बांधण्याच्या रुपये १ कोटी ६१ लाखाच्या खर्चाच्या प्रस्तावाला रस्ते अनुदानांतर्गत २ वर्षापूर्वी मंजूरी मिळाल्यावर भुमीपुजन होऊन सदर पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू पुलाच्या बांधकामाकरीता वैशिष्टयपूर्ण अनुदानातंर्गत निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन शासनाने १८ महसुली गावामध्ये १५,१८४ हेक्टरवर झालर क्षेत्र विकसित करणेबाबत

(२३) २९०१३ (२१-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन शासनाने १८ महसुली गावामध्ये १५,१८४ हेक्टरवर झालर क्षेत्र विकसित करण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरणाची म्हणून नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झालर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे विकासकाम, इमारत बांधकाम, पुनर्विकास, रेखांकन करून प्लॉटची विक्री करण्यासाठी सिडकोच्या विशेष नियोजन प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या प्लॉट धारकांनी व विकासकांनी बांधकामे परवानगी न घेता केली आहे त्यांच्या विरोधात सिडको नियोजन प्राधिकरणाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :(१) व (२) नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.टिपीएस-३००६/सीआर-२४६/२००६/नीव-३०, दिनांक ३.१०.२००६ अन्वये औरंगाबाद महानगरापालिका हद्दीलगत असलेल्या २८ महसूली गावातील १५.१८४ हेक्टर क्षेत्राकरिता सिडकोची शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण महसूल नियुक्ती केली आहे.

(३) व (४) अनधिकृत बांधकाम नियंत्रक पथकाद्वारे सदर अनधिकृत प्रकरणात नोटीस देण्यात येऊन थांबविण्यंची आणि तोडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आलेले आहेत.

औरंगाबाद महानगरपालिका कर्मचारी भरती प्रकरणाबाबत

(२४) २९०१६ (२१-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सन २००४ मध्ये उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार ११२४ कर्मचाऱ्यांची भरती केली या भरतीमध्ये न्यायालयाने जेष्ठता यादीही निश्चित करून दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत ही भरती प्रक्रिया सुरु न होण्याची कारणे काय,

(३) तसेच शासकीय सेवेमध्ये भरती होण्याकरिता ९ ते ११ महिन्याचा परीविक्षाधीन कालावधी लागतो, परंतु महानगरपालिकेने नवीन भरती केलेल्या ११२४ कर्मचाऱ्यांना ११ वर्ष उलटूनही आजतागायत त्यांना संपूर्ण वेतन दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) सन २००४ मध्ये भरती प्रक्रिया पूर्ण करुन ११२४ कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही, सदर कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधिन कालावधी संपविण्यात आला असून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाचे आर्थिक फायदे देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कांजुरमार्ग, देवनार व मुलुंड येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्याबाबत

(२५) ३०४१६ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांजुरमार्ग, देवनार व मुलुंड येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्याची विंल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्यात येत नसल्यामुळे या तिन्ही डम्पिंग ग्राऊंडमध्ये घनकचऱ्याचे ढिग जमा होऊन त्यांची दुर्गंधी आजुबाजूच्या परिसरात पसरून त्या भागातील नागरिकांना त्वचेचे व डोळाचे विकार जडू लागले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तिन्ही डम्पिंग ग्राऊंड मधील घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयाना सप्टेंबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कांजूर डंम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे विक्रोळीसह आजुबाजुच्या भागातील नागरिकांना त्रास होत असल्याने तेथील नागरिकांनी आठवड्याभरात दुर्गंधी न थांबविल्यास पालिकेच्या विरोधात जन आंदोलन करण्याचा इशारा दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ वा त्या दरम्यान दिला हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, कांजुरमार्ग, देवनार व मुलुंड येथे टाकण्यात येणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. तथापि खबरदारी म्हणून देवनार क्षेपणाभूमीच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी महापालिकेमार्फत आरोग्य शिबिरे घेण्यात येतात.

(२) हे खरे आहे.
(३) कांजुर डंपिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. हे खरे नाही. परंतु तेथील नागरीकांनी सदर विषयाचा निर्णय आठ दिवसांत न झाल्यास जन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. हे खरे आहे.
(४) कांजूर येथे मार्च, २०१५ पासून दररोज कचरा स्विकारण्यास सुरुवात झाली असून सध्या तेथे दररोज ३००० मे. टन कचरा स्विकारुन त्यावर महापालिकेमार्फत शास्त्रोक्त पध्दतीने बायोरिॲक्टर तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्यात येत आहे.

तसेच, नजीकच्या भविष्यात महापालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यास सुरुवात झाली आहे :-

- कांजूर येथे १००० टन क्षमतेचा खतनिर्मिती प्रकल्प उभारणे.
- देवनार येथे २०० टन क्षमतेचा कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याचा प्रकल्प उभारणे.
- मुलुंड क्षेपणभुमी येथील कचरा हलवून क्षेपणभूमीची जमीन योग्य त्या तंत्रज्ञानाद्वारे पुन:प्राप्त करणे.
- राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या मुलुंड (पूर्व) येथील ऐरोली पुलानजीक ३२.७७ हेक्टर जागेत ५००० मे. टन क्षमतेचे कचरा प्रक्रिया केंद्र उभारणे.
- राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या मौजे करवले गांव, ता.अंबरनाथ येथील ३८.८७ हेक्टर जागेत कचरा प्रक्रिया केंद्र उभारणे व कचऱ्याची शास्त्रोक्तरित्या विल्हेवाट लावणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धारावी विभागात महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठयाच्या नळामधून दुर्गंधीयुक्त व दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

(२६) ३०५०६ (२१-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी प्रभाग क्र. १७६ मधील धोबीघाट, जीवनज्योती सोसायटी, नवजीवन सोसायटी, ट्रॅझिस्ट कॅम्प, सोशल नगर, विजयनगर, गांधीनगर, मरिअम्मा मंदीर परिसर आझादनगर ९० फुटी रोड आदि ठिकाणी महापालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठयाच्या नळामधून दुर्गंधीयुक्त व दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत उल्लेखित परिसरातील नागरीकांना स्वच्छ व दुर्गंधी विरहित पाणी उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) धारावी प्रभाग क्र. १७६ मधून दुषित पाणी पुरवठ्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या हे खरे आहे.

तथापि सदर ठिकाणी महापालिकेमार्फत मुख्य जलवाहिनीची सी.सी.टी.व्ही द्वारे पाहणी करुन गळतीचा स्त्रोत शोधून काढण्यात आला तसेच सदर जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करण्यात आली.

त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला हे खरे नाही.

(२) व (३) महापालिकेमार्फत दुषित पाणी पुरवठ्याच्या समस्यांचे निरसन करुन सदर वस्तीमधील पाण्याचे नमुने तपासणीसाठी साठविण्यात आले.

तथापि, सदर ठिकाणच्या पाण्याच्या नमुन्याचा अहवाल पिण्यायोग्य असल्याचे तपासणी अहवालात आढळून आले.

(४) दुषित पाणी पुरवठ्याच्या विभागात वेळोवेळी जलजोडणीची तपासणी करणे (बॅक फ्लो चेक करणे), हायड्रन्ट फ्लश करणे, तसेच गळती / दुषित पाण्याचे स्त्रोत शोधून काढण्याकरिता सी.सी.टी.व्ही द्वारे जलवाहिन्याची अंतर्गत तपासणी इत्यादी उपाययोजना महापालिकेमार्फत करण्यात आल्या आहेत.

मुंबई वारस वास्तु (हेरिटेज) परिसर असलेल्या मरीन ड्राईव्ह भागात बांधण्यात आलेल्या जिमबाबत

(२७) ३०६४२ (२१-०१-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वारस वास्तु (हेरिटेज) परिसर असलेल्या मरीन ड्राईव्ह भागात बांधण्यात आलेल्या जिमबाबत वैद्यतेची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) मुंबई वारस वास्तु (हेरिटेज) परिसर असलेल्या मरीन ड्राईव्ह भागात बांधण्यात आलेल्या जिमबाबत वैद्यतेबाबतची कोणतीही चौकशी प्रस्तावित नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील लोअर परेल परिसरातील गणपतराव कदम मार्ग व वरळी कोळीवाड्यातील स्टॉलवर बुलडोजर फिरविल्याबाबत

(२८) ३०७५७ (२१-०१-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परेल परिसरातील गणपतराव कदम मार्ग व वरळी कोळीवाड्यातील ५० वर्षे जुन्या असलेल्या स्टॉलवर व वृत्तपत्र विक्रेत्यावर महानगरपालिकेच्या जी-दक्षिण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी स्टॉलधारकांना कोणतीही पुर्व सूचना न देता व त्यांच्या कडील पुराव्याच्या कागदपत्रांची तपासणी न करता बुलडोजर फिरवून दुकाने जमिनदोस्त केल्याची घटना दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाईबाबत स्थानिक आमदार व नगरसेवकांनी जी-दक्षिण कार्यालयात आंदोलन करुन सदर दुकाने ही विकासकाला मदत करण्यासाठी तोडण्यात आल्यामुळे व विकासकाला सहाय्यक आयुक्त हे मदत करत असल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी पालिकेचे उपायुक्त व मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २० वर्षापासून उपजीविकेचा व्यवसाय वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या स्टॉलवर त्यांच्याकडे असलेली अधिकृत कागदपत्रे न तपासता व त्यांना पूर्व सुचना न देता विकासकाच्या फायद्यासाठी सहाय्यक आयुक्तांनी केलेल्या कारवाई विरोधात निवेदनातील मागणीनुसार महानगरपालिकेच्या आयुक्तांनी व जी-दक्षिण विभागाचे उपायुक्त यांनी काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत दोषी आढळलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) मुंबईतील लोअर परेल परिसरातील गणपतराव कदम मार्गावर दि. १९.०८.२०१५ रोजी महापालिकेच्या जी/दक्षिण विभागामार्फत अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

परंतु, सदर निष्कासन कारवाई करताना सिग्नल जवळील दोन दुकानांच्या बाहेरील छपरा (जो रस्त्यावर आलेला होता) व बस/इतर वाहनांच्या रहदारीला अडथळा ठरत होता, तो भाग जे.सी.बी. यंत्राच्या सहाय्याने काढण्याचा प्रयत्न केला असता, दोन्ही दुकानाच्या दर्शनी भागाचे थोडेसे नुकसान झाले परंतु कोणतेही दुकान जमीनदोस्त केलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर निष्कासन कारवाई करण्यात आलेल्या स्टॉलमध्ये वृत्तपत्र विक्री व्यवसायाचा स्टॉल नव्हता.

सदर प्रकरणी महापालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून ,सदर कारवाईत कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्यामुळे महापालिकेमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोडक सागर व वैतरणा तलावात इगतपुरी नगरपरिषदेकडून कचरा व जनावरांचे अनुशेष व इतर घातक पदार्थ टाकले जात असल्याबाबत

(२९) ३०७८५ (२१-०१-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोडक सागर तलावात व वैतरणा तलावात इगतपुरी नगरपरिषदेकडून कचरा व जनावरांचे अनुशेष व इतर घातक पदार्थ टाकले जात असल्याने ही तलावे दुषित होत असल्याची गंभीर बाब राज्य शासनाच्या तसेच मुंबई महानगरपालिकेच्या माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत त्या जलस्त्रोतांची तपासाणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाण्याच्या नमुन्यात कोणत्या प्रकारचे हानीकारक घटक आढळून आले आहे,

(४) असल्यास, याबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) दिनांक २०.०८.२०१५ व दिनांक २१.०८.२०१५ रोजी हिंदुस्थान टाईम्स वृत्तपत्रात नगरपरिषदेतर्फे इगतपुरी शहरामधून जाणारे झरे/ओहोळ/नाला यांमध्ये घरगुती, औद्योगिक व इतर विषारी द्रव्ये सोडण्यात येत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैतरणा नदीवर बांधण्यात आलेल्या मध्य वैतरणा धरणातील पाणी दुषित होते अशी बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे आहे.

(३) माहे जुलै व ऑगस्ट, २०१५ या कालावधीत वैतरणा धरणामधून येणाऱ्या पाणाच्या नमुन्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप जलशुध्दीकरण संकुलाच्या प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये कुठल्याही प्रकारचे प्रदुषण आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील माहनगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयातील डॉक्टर्स परिचारिका व कर्मचाऱ्यांना एन ९५ मास्क पुरविणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत

(३०) ३०९३७ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयात एका परिचारीकेला क्षयरोगाची लागण झाल्याने मृत्यु झाला होता. त्यानंतरही डॉक्टर परिचारीका आणि इतर कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जात नसून त्यांना पूरविण्यात येणाऱ्या ९५ मास्कचा तुटवडा जाणवत असून अनेक महिन्यापासुन हे मास्कच पुरविण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात बहुतांश कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून अद्याप ती भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न १ नुसार या रुग्णालयातील डॉक्टर्स परिचारिका व कर्मचाऱ्यांना एन ९५ मास्क पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रश्न २ नुसार या रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयात एका परिचारिकेला क्षयरोगाची लागण झाल्याने तिचा मृत्यू झाला होता हे खरे आहे.

क्षयरोग रुग्णालय समूह येथील कर्मचाऱ्यांना महापालिकेमार्फत तिन्ही पाळ्यांमध्ये नियमित सकस आहार देण्यात येत आहे. तसेच, कर्मचाऱ्यांची दर तीन महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून, त्यांना औषधे विनामूल्य देण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत क्षयरोग रुग्णालय समूह येथे ३०००० एन ९५ मास्कचा साठा उपलब्ध असून ते एक दिवसाआड कर्मचाऱ्यांना नियमित पुरविण्यात येत आहेत.
(२) क्षयरोग रुग्णालाच्या आस्थापनेवरील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांची एकूण २७ पदे असून, त्यापैकी २० पदे महानगरपालिकेमार्फत भरण्यात आली असून, उर्वरित ७ पदांवर बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परिचारिका या संवर्गातील एकूण २७६ पदांपैकी २३१ पदे भरण्यात आली असून, उर्वरित ४५ पदे जाहिरातीद्वारे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत.

चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमध्ये सफाई कामगारांची एकूण २३३, कक्ष परिचर १८२ व आय ४९ याप्रमाणे ४६४ पदे असून त्यापैकी ३९९ पदे भरण्यात आली आहेत व ६५ पदे रिक्त आहेत.
(३) डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचाऱ्यांना एन ९५ मास्काचा पुरवठा करण्यात येत असून, त्याचा आवश्यक तो साठा उपलब्ध आहे.
(४) क्षयरोग रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि.नागपूर) शहरातील दुधाळा कवडक परिसरातील २६५ घरकुलांच्या बांधकामाबाबत

(३१) ३४६३८ (२१-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) शहरातील दुधाळा कवडक परिसरातील २६५ घरकुलांच्या बांधकामाला केंद्र व राज्य शासनाने एस.एल.सी.सी. च्या सभेत आय.एच.एस.डी.पी. अंतर्गत मंजुरी दिली असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुलाच्या डी.पी.आर.प्रस्ताव तयार करुन अंतिम मान्यतेसाठी गृहनिर्माण विभागाकडे नगरपालिका प्रशासनाने पाठविला होते हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या घरकुलांची डी.पी.सी.तयार करताना प्रति लाभार्थ्याकडून १२०० व कर घेऊन करारनामा करण्यात आला हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर घरकुलांचे अद्याप ही बांधकाम पूर्ण झाले नसून लाभार्थ्यांना घरकुल योजनांचा लाभ मिळाणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. प्रकाश महेता (१७-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत रामटेक नगरपरिषद अंतर्गत २६५ गृह प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियत्रण समितीच्या (CSMC) दि.३.६.२००८ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर प्रकल्प ७२ घरकुलांसाठी सिमित करण्यात आला असून ही सर्व घरकुलांचे काम अंतीम टप्यात असल्याचे मुख्याधिकारी, रामटेक नगरपरिषद यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांना दि.९.२.२०१६ च्या पत्राने कळविले आहे.
(२) मुख्य अभियंता-२ जेएनएनयुआरएम म्हाडा यांच्या मार्फत सदर योजनेचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, हुडको यांना दि.३०.३.२०१५ रोजी पाठविण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.

गृहनिर्माण विभागाच्या दि.२५ जून, २००७ च्या शासननिर्णया मधील परि.११.१० नुसार केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता सर्व साधारण प्रवर्गात १२% व अनु.जाती/जमाती व इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांकडून १०% इतके अंशदानाची वसुली संबंधित अंमलबजावणी यंत्रणानी करावयाची आहे.
(४) व (५) सर्व ७२ घरकुलांचे काम पायाभूत सुविधेसह अंतिम अप्प्यात असून लाभार्थी हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर घरकुलांचे वाटप करण्यात येईल.

परतुर (जि.जालना) शहरात नगर पालिकेच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या घरांच्या गृहप्रकल्पाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(३२) ३५९०५ (२१-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकार पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत परतुर (जि.जालना) शहरात नगरपालिकेच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या २०१३, ५७२ लाख रुपयांच्या ८०० घरांच्या गृहप्रकल्पाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये केंद्र शासनाचे ११५० लाख रुपये, राज्य शासनाचे ७५८.२३ लक्ष रुपये आणि लाभार्थ्याचा वाटा २६.७२ लक्ष रुपये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१७-०६-२०१६) :(१) व (२) केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत परतूर नगरपरिषद अंतर्गत ८०० गृह प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) च्या १४४ व्या बैठकीत दि.२६.११.२०१३ रोजी मान्यता दिली आहे. ८०० मंजूर घरकुलांपैकी ४५१ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून लाभार्थ्यांना या घरकुलांचा ताबा देण्यात आला आहे. ३४९ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाने मंजूर व वितरित केलेला निधीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

मंजूर अनुदान		वितरित निधी		
केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	अतिरिक्त अनुदान
१२७७.८९	६३१.०५	११५०.११८	२१६.५८८	५४१.२४

यामध्ये लाभार्थींचा हिस्सा रक्कम रु.१३२.०० लक्ष इतका आहे.
(३) होय.

सदर प्रकल्पाची मे.एस.जी.एस. इंडिया प्रा.लि. या Third Party inspection Monitoring Agency (TPIMA) मार्फत या प्रकल्पाची तीन वेळा प्रत्यक्ष पाहणी करुन तपासणी केली असता, सदर प्रकल्पाच्या कामाचा दर्जा सर्वसाधारण असल्याचे अभिप्राय या संस्थेन नोंदविले आहेत. तसेच मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दि.०४.०९.२०१५ रोजी परतूर येथील गृहप्रकल्पाच्या स्थळास प्रत्यक्ष भेट दिली असता प्रत्यक्ष पाहणीमध्ये त्रुटी व दोष आढळून आल्याने त्यासंदर्भात सुधारणा करण्याबाबत मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी सूचित केले होते. त्यानुसार संबंधित ठेकेदाराने बांधकामाच्या दर्जा व गुणवत्तेमध्ये सुधारणा केली असल्याबाबतचा अहवाल नगरपरिषदेने दि.६.१०.२०१५ रोजी शासनास सादर केला आहे.
(४) परतूर नगरपरिषदेमार्फत बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेची चौकशी दक्षता व गुणनियंत्रक पथक (Vigilance &; Quality Control) म्हाडा व अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना यांच्या संयुक्त समितीमार्फत करण्यात यावी असे उपाध्यक्ष, म्हाडा व जिल्हाधिकारी, जालना यांना दि.७ एप्रिल, २०१६ च्या पत्राने कळविण्यंत आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर सुधार प्रन्यास व महानगरपालिका हद्दीत येणारे भुखंड कंपोस्ट डेपो, बफर झोन या विविध आरक्षणामुळे नियमितीकरण्यापासून वंचित असल्याने आरक्षण वगळण्याबाबत

(३३) ३६४२० (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विविध आरक्षणांतर्गत जमिनीवरील अनधिकृत अभिन्यासातील गुंठेवारी विकास नियमित करण्यासंदर्भात संबंधित नियोजन प्राधिकरणास सल्ला देण्यासाठी सह संचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली सल्लागार समिती गठीत करण्याचे दिलेल्या निर्देशनानूसार समितीने उक्त कंपोस्ट डेपो, बफर झोन या सह विविध आरक्षणावरील गुंठेवारी विकासासंदर्भात संबंधित नियोजन प्राधिकरणास सल्ला देणे आवश्यक असून सदर प्रकरणी सल्लागार समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नियुक्त करण्यात सल्लागार समितीने आरक्षण वगळण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, समितीस सदर प्रकरणी निर्णय घेण्यास किती कालावधी लागणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :(१) हे खरे आहे. शासनाच्या नगर विकास विभागाच्या दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ च्या पत्रानुसार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ च्या कलम ५(१) अन्वये नियोजन प्राधिकरणास (सभापती नागपूर सुधार प्रन्यास) असलेल्या अधिकारांतर्गत गुंठेवारी विकासाखालील आरक्षण विकसीत करण्याची व्यवहार्यता तसेच संबंधित भागात अशा आरक्ष्पाणाची गरज इ. परामर्श घेऊन, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना सुयोग्य सल्ला देण्याकरिता तज्ञ व जबाबदार अधिकारी यांचा समावेश असलेली सल्लागार समिती गठीत करण्याचे निदेश निर्गमित केले होते.

(२) उक्त समितीने दिनांक १२.११.२०१४ अन्वये कंपोस्ट डेपोचे आरक्षण वगळण्याचे संदर्भात शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करुन द्यावे व त्यानुसार कार्यवाही करण्याचा सल्ला दिला होता.

(३) वरील विषयाच्या संदर्भात, मौजे चिखली (खुर्द) व मौजे मानेवाडा एकूण क्षेत्र ७२.१५८४ हेक्टर आर. ही जागा विकास योजनेतील कंपोस्ट डेपो (एस-१६१) या आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये समितीच्या सल्ल्यानुसार प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर केला होता. या प्रस्तावास शासनाने दिनांक २५.१.२०१६ रोजी मान्यता दिलेली आहे.

भोकरदन (जि.जालना) नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषदेकडून हद्दवाढ योजनेंतर्गत शहरातील म्हाडा डीपी रोड या रस्त्यावरील पुलाचे काम अर्धवट असल्याबाबत

(३४) ३७८१० (२१-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) नगरपरिषद हद्दीतील भोकरदन नगरपरिषदेकडून हद्दवाढ योजनेंतर्गत शहरातील म्हाडा डीपी रोड या रस्त्यावरील पुलाचे काम अर्धवट असल्याने सदरहू रस्ता नागरिकांना वाहतूकीस खुला करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे काम अर्धवट असल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व पुलाचे काम पुर्ण करुन रस्ता वाहतूकीस खुला करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१६) :(१) होय.

(२) व (३) माहे जून ते सप्टेंबर, या कालावधी दरम्यान पावसाळ्यामुळे सदरहू कामास विलंब झाला आहे. तथापि, आज रोजी पर्यंत सुमारे ९० टक्के कामे पूर्ण झाली असून सदरहू पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी जालना यांनी मुख्याधिकारी नगर परिषद भोकरदन यांना दिल्या आहेत.

मुंबईतील केईएम रुग्णालयात रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांना शवागारात मृतदेहाची चिरफाड करण्याचे काम दिल्याबाबत

(३५) ३९४४७ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळच्या केईएम रुग्णालयात रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांना शवागारात मृतदेहाची चिरफाड करण्याच्या कामाला जुपण्यात आले असल्याने या कर्मचाऱ्यांत असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शवचिकित्सा विभागात १० पैकी ४ पदे रिक्त आहेत तसेच सहाय्यकची तीन पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केईएम रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

के.ई.एम रुग्णालयात नियमित कामगार उपलब्ध नसल्यास डॉक्टरांच्या देखरेखीखाली रोजंदारी कामगारांकडून शवविच्छेदनाच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या साफसफाईचे अत्यावश्यक काम करुन घेतले जाते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पदोन्नती / निवडीची विहित कार्यपध्दती अवलंबून के.ई.एम. रुग्णालयातील सदर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

राज्यातील साखर कामगारांच्या वेतनवाढीबाबत

(३६) ३९९०४ (१७-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कामगारांच्या वेतनवाढीचा करार दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी संपल्यानंतर शासनाने दिनांक ८ जुलै, २०१५ रोजी श्री. शिवाजीराव गिरीधर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, या अहवालावर राज्य शासनाने कोणती अंमलबजावणी केली आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१८-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) नाही.

समितीने आपला अहवाल शासनाला सादर केलेला नाही.

(५) राज्यातील साखर कामगारांच्या वेतनवाढीबाबतच्या मागण्यांवर त्रिपक्षिय समितीमध्ये अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. परंतु अद्यापि समितीचा अंतीम निर्णय न झाल्यामुळे शासनास अहवाल पाठविणे प्रलंबित आहे. समितीचा कार्यकाल दिनांक ०७/०१/२०१६ रोजी संपुष्टात आल्यामुळे समितीच्या मुदतवाढीच्या प्रस्तावानुसार शासनाने ६ महिन्याची मुतदवाढ दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिली आहे. त्यानुसार समितीच्या बैठका वेळोवेळी आयोजित करण्यात येत आहे व चर्चा सुरु आहे.

भांडुप येथील सोनापूर परिसरात पूर्व उपनगरातील नागरीकांसाठी सुपरस्पेशॅलिटी रूग्णालय उभारण्याबाबत

(३७) ४०७२७ (१४-०३-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप येथील सोनापूर परिसराच्या पूर्व उपनगरातील नागरीकांसाठी एका भूखंडावर ५५० खाटांचे सुपरस्पेशॅलिटी रूग्णालय उभारण्याचे महापालिकेने ३ वर्षापूर्वी निश्चित केले असून या रूग्णालयासाठी तब्बल १५० कोटी रूपयांची तरतूद तसेच तज्ञ सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली असून सुपरस्पेशॅलिटी रूग्णालय उभारण्यासाठी शासनाने यापूर्वीच तत्वता मान्यता दिलेली असताना अद्यापपर्यंत सदरहू रूग्णालयांच्या उभारणीचे काम सुरूच झालेले नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त रूग्णालयांच्या उभारणीच्या कामास सुरूवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू रूग्णालय लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१६) :(१) भांडुप येथील सुपरस्पेशॉलिटी रुग्णालयाचे कामे अद्यपित सुरु झालेले नाही हे खरे आहे.

तथापि, सदर रुग्णालय उभारण्यासाठी रु.१५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली नसून, सन २०१५-१६ मध्ये रु.५० लाख इतक्या रकमेची तरतूद महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञातर्फे भांडुप येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी मे. शशि प्रभू ॲण्ड असोसिएटस (वास्तुशास्त्रज्ञ) व टेलिकॉम हेल्थकेअर प्रा.लि. (आरोग्य सल्लागार) यांची एकत्रित नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर भूखंडाचा अंतिम भूभाग निश्चित करण्यासाठी सदर प्रस्ताव महापालिकेच्या विकास नियोजन विभागाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी महापालिका वास्तुशास्त्रज्ञ विभागाकडून पाठविण्यात आलेला आहे.

अंतिम भूभागाची निश्चिती झाल्यावर आराखडा बनविणे, महापालिकेच्या इमारत प्रस्ताव खात्याकडून मंजुरी प्रप्त करणे, अंदाजपत्रक तयार करणे इ. कामे सल्लागारामार्फत करण्यात येतील.

(३) मौजे नाहूर येथील औघेगिक क्षेत्रातील न.भू. क्र. ६८१/७, ६८१/८, ६८१/९, ६८१/११ व ६८१/१२ या भूखंडावर विकास नियंत्रण नियमावली ५७ (४) (क) अन्वये निवासी वापर अनुज्ञेय करताना १८७६५.३० चौ.मी. चा सुविधा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस "विकास हस्तांतरण हक्काच्या" मोबदल्यात उपलबध झाला आहे.

तद्नंतर विकासकानी सदर जमिनीवरील रस्त्याचे क्षेत्रफळ उपरोक्त सुविधा भूखंडामध्ये समायोजित करुन ८२०९.३० चौ.मी. क्षेत्रफळ परत मिळण्याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. १८८५/२०१४ दाखल केली होती सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२९.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये विकासकाची विनंती मान्य केली.

सदर आदेशास मुंबई महानगरपालिकेमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान याचिका क्र.४६/२०१६ दाखल करण्यात आली होती. तथापि मा.सर्वोच्च न्यायालयाने, मा.उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवुन सदर याचिका दि.११.०१.२०१६ रोजी खारीज केली.

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर सुविधा भूखंडमधून ८२०९.३० चौ.मी. चा भूखंड विकासकास परत करणे आवश्यक असल्यामुळे विकासक मे. रुणवाल होम्स ॲड मॉल्स प्रा.लि. यांच्या सोबत दिनांक ०८.०३.२०१६ रोजी महानगरपालिकेमध्ये बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये विकासकास ८२०९.३० चौ.मी. चे विकास हस्तांतरण हक्क परत करण्याचे प्रस्ताव सादर करण्याचे प्रस्ताव सादर करण्याचे सांगण्यात आले आहे. तथापि, अद्यापपावेतो विकासकाने तशा प्रकारचा प्रस्ताव महापालिकेस सादर केलेला नाही.

उर्वरित १०००० चौ.मी. क्षेत्रफळावर सदर रुग्णालय उभारण्याच्या अनुषंगाने महापालिका वास्तुविशारदामार्फत प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातून मिळणाऱ्या खनिकर्म निधीमधून खान परिसराचा विकास करण्याबाबत

(३८) ४१३८१ (१३-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी तालुक्यामध्ये उदगिरी, धनगरवाडी, मानोली, रिंगेवाडी, गिरगाव येथे अनेक वर्षापासून बॉक्सइटचे उत्खनन सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्खननामुळे शासनाकडे गत वर्षापासून कोट्यावधी रुपयांची बॉक्सईट रॉयल्टी जमा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उत्खननासाठी वापरण्यात येणाऱ्या अवजड वाहनांमुळे तसेच मशिनरीच्या वापरामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था झाली आहे व पाण्याचे स्त्रोत नष्ट झाले असून, उक्त परिसरात राहणाऱ्या लोकांची गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडे जमा असलेल्या बॉक्सईट रॉयल्टी मधून खान परिसराचा विकास करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे. तसेच खाणक्षेत्रातून होणाऱ्या खनिजाच्या वाहतूकीमुळे रस्ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(४) खनिज विकास निधीचा अंतर्गत खाणबाधित क्षेत्राचा विकासाकरिता शासनाद्वारे तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार लोकप्रतिनिधीं/स्वराज्य संस्था यांच्या मागणीनुसार खाणबाधित क्षेत्राकरिता प्राप्त प्रस्तावांवर जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचयामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वरीलबाबत सन १९९९ ते २०१५-२०१६ दरमयान सदर तालुकयातील २० विकास कामांकरिता रु.२९७.३० लाख निधी मंजूर करण्यात आला असून, १४ प्रस्ताव मान्यतेस्तव शासनाकडे सादर करण्यात आलेल आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत छोटया शहराबरोबरच राज्यातील ग्रामीण भागातील लोकांसाठी म्हाडाची योजना राबविण्याबाबत

(३९) ४३४४३ (०३-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत छोटया शहराबरोबरच राज्यातील ग्रामीण भागातील लोकांसाठी म्हाडाची योजना राबविणार आहे अशी माहिती राज्याचे मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास पंढरपूर (जि.सोलापूर) येथे दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप कशा प्रकारचे आहे,
(३) असल्यास, सदर योजना शासन राज्यातील ग्रामीण भागात कधीपासून सुरु करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१७-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

अशा प्रकारची घोषणा मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी केली नसल्याचे मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या कार्यालयाने कळविले आहे. तथापि, प्रधानमंत्री आवास योजना शहरी क्षेत्र व शहराच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या नियोजन क्षेत्रात लागू करण्याच्या प्रस्तावास मा.मुख्य सचिवांच्य अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मंजूरी व संनियंत्रण समितीने मान्यता दिली आहे. सर्वांसाठी घरे बांण्याचा राज्य शासनाचा मानस असल्याचे मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी त्यांचे भाषणात नमूद केले होते.

(२) व (३) "सन २०२२ पर्यंत सर्वासाठी घरे" या संकल्पनेवर आधारीत प्रधनमंत्री आवास योजना राज्य शासनाने नागरी क्षेत्र व विशेष नियोजन प्राधिकरणाच्या नियोजन क्षेत्रात काही सुधारणांसह राज्यात लागू केली आहे. सदर योजना ४ घटकांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत दि.९.१२.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लांजा (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये सोयी-सुविधा तसेच प्राचार्य उपलब्ध करण्याबाबत

(४०) ४४०५३ (०५-०५-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये बऱ्याच सोयी-सुविधा तसेच माहे जून, २०१२ पासून या संस्थेस कायमस्वरुपी प्राचार्य उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याठिकाणी प्रशिक्षणासाठी येणारे विद्यार्थी प्रशिक्षणापासून वंचित राहत असल्याने याठिकाणी १०० विद्यार्थ्यांचे वसतीगृह बांधण्याबाबतचा प्रस्तावदेखील अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.गृहनिर्माण तथा उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रशिक्षण केंद्रात तात्काळ सोयी-सुविधा तसेच प्राचार्य उपलब्ध करण्याबाबत तसेच वसतीगृहाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१), (२) व (३) शासन आदेश, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : व्यशिअ-२०१३/(१४४/१३)/ व्यशि-१, दिनांक ३० मार्च, २०१५ मधील अ.क्र.६१ अनुसार "औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लांजा, जि.रत्नागिरी" येथे श्री.शशिकांत गणपत कोतवडेकर यांची प्राचार्य म्हणून पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. सदर संस्थेतील इंजिनिअरींग ट्रेडमधील सर्व जागा भरल्या असून वसतीगृहाच्या कारणास्तव एकही जागा भरल्या असून वसतीगृहाच्या कारणास्तव एकही जागा शिल्लक राहिलेली नाही. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीनी ५० प्रशिक्षणार्थ्यांसाठी वसतीगृहाचा प्रस्ताव करण्यात आला होता. तथापि, प्रशिक्षणार्थी व पालक यांची वसतीगृहागाबाबतची कोणत्याही स्वरुपाची मागणी नसल्याने त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भ्वत नाही.

तथापि, सदर संस्थेमध्ये वसतीगृहाची मागणी आल्यास, आवश्यकतेप्रमाणे प्रकरण तपासून त्याप्रमाणे पुढील निर्णय घेण्यात येईल.

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकासाबाबत

(४१) ४४३४५ (१७-०५-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सदा सरवणकर (माहिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या मुंबईतील सिडकोच्या महत्वाकांक्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकासाच्या दुस-या टप्प्यातील १५ हजार कोटी रुपयांच्या निविदांना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळासाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे काय व यामधून किती कालावधीत अंतिम निविदा निवडण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे व सदर विमानतळाचा पहिला टप्पा विकसित होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) तसेच, नवी मुंबई जवळील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आराखड्याचे सिडकोने केंद्र शासनाच्या नागरी उड्डाण विभागाकडे दिनांक ३० डिसेंबर, २०१५ मध्ये नवी दिल्ली येथे सादरीकरण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रात्यक्षिक सादरीकरणानंतर केंद्र शासनाच्या नागरी उड्डाण विभागाने सदर विमानतळ उभारण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली असून, उक्त विमानतळासाठी लागणारी जमीन सिडकोने अधिग्रहीत केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्नोक्त भाग (२) बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०६-२०१६) :(१) व (२) होय, निविदा मागविण्याची प्रक्रिया ४ मे, २०१६ रोजी सुरु करण्यात आली असून डिसेंबर, २०१६ पर्यंत अंतिम निविदा निवडण्याचे काम पूर्ण होणे अपेक्षित असून डिसेंबर, २०१९ पर्यंत विमानतळाचा पहिला टप्पा कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(३) व (४) होय.

(५) ठरलेल्या कालावधीत काम पूर्ण करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

वेळवण जुगाई (ता.शाहूवाडी) येथील खाणीतून होत असलेले बेकायदा बॉक्साईट उत्खनन

(४२) ४४७१९ (१७-०५-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेळवण जुगाई (ता.शाहूवाडी) येथे खाणीतून बेकायदा बॉक्साईट उत्खनन होत असून उत्खननापासून ते कारखान्यात पोहोचवण्यापर्यंत सर्वच पातळयांवर शासकीय नियमांना डावलून आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक गैरव्यवहारात शासकीय यंत्रणेचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला महानगरपालिकेची बिंदु नामावली सन २००६ पासून अद्यावत करण्यात आली नसल्याबाबत

(४३) ४४७५३ (०७-०५-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकेची बिंदु नामावली दर तीन वर्षांनी विभागीय आयुक्त यांच्याकडून अद्यावत करणे आवश्यक असताना अकोला महानगरपालिकेची बिंदु नामावली सन २००६ पासून अद्यावत करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिंदु नामावलीमुळे पदोन्नती विविध संवर्गातील भरती रखडली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या दैनंदीन कामावर भरती प्रक्रिया बंद असल्यामुळे दुष्यपरिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बिंदु नामावली तातडीने अद्यावत करणे करिता व भर्ती व पदोन्नतीची समस्या सोडविणे करिता शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

दिनांक २६/१०/२००७ च्या मंजूर बिंदू नामावलीनुसार दिनांक ०१/०८/२००९ व दिनांक ०९/०८/२०१२ रोजी पदोन्नती संवर्गातील रिक्त पदांवर महानगरापालिकेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.
(३) नाही. कार्यरत कर्मचारी यांचेकडून दैनंदिन कामे अतिरिक्त स्वरुपात करुन घेतली जातात.
(४) सरळसेवा बिंदु नामावलीस विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांचे कार्यालयातील मागासवर्ग कक्षाकडून दिनांक २५/०१/२०१६ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

पदोन्नतीची बिंदु नामावली प्रस्तावित केली असून, किरकोळ त्रुट्यांची पूर्तता करणे सुरु आहे.
(५) शा.नि.सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ब दिनांक २६/१०/२००४ नुसार बिंदु नामावली अद्ययावत करण्याचे काम प्रगती पथावर आहे. असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

राज्यात व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत करण्यात आलेल्या शुल्कवाढीबाबत

(४४) ४४८१८ (१७-०५-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या आयटीआय मध्ये मुलांना प्रवेश घेण्याकरिता आलेल्या शुल्कवाढीत नोंदणी काम करणाऱ्या संस्थेला व अधिकाऱ्यांचा लाखो रुपये फायदा होण्याकरिता केलेल्या अन्यायकारक शुल्क वाढीची व या सर्व प्रकाराची कसून चौकशी करावी अशी लेखी मागणी शिक्षक आमदार रामनाथ मोते यांनी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे राज्यमंत्री व खात्याचे प्रधान सचिव यांचेकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक आमदारांनी पाठविलेल्या पत्रात नोंदविलेल्या तक्रारीमध्ये केलेल्या प्रमुख मागण्या कोणत्या, संबंधीत कंपनीला गेल्यावर्षीपेक्षा दुप्पट शुल्क कमिशन म्हणून देण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, नोंदणी शुल्क तसेच अनामत रक्कम, परिक्षा शुल्क, सेमिस्टर शुल्क, प्रशिक्षण शुल्क, इंटरनेट सुविधा शुल्क, ओळखपत्र शुल्क इ. विविध बाबींकरीता दुप्पट शुल्क आकारुन यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याबाबतचा तपास करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या अनामत रक्कम, परिक्षा शुल्क, प्रशिक्षण शुल्क, इंटरनेट शुल्क, ओळखपत्र शुल्क तसेच प्रवेश नोंदणी शुल्क इत्यादीमध्ये झालेली वाढीसंदर्भात तसेच सीएमसी कंपनीला ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी रुपये ३०/- वरुन रुपये ७८/- इतकी वाढ देण्यासंदर्भातील तक्रारीचा समावेश आहे.

शासनाने दिनांक १४.०५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये खाजगी औद्योगिक प्रवेश प्रक्रिया लागू केल्यामुळे कामाच्या व्याप्तीत झालेल्या वाढीमुळे प्रवेश प्रक्रिया खर्चात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यानुसार ऑगस्ट, २०१५ च्या प्रवेश सत्रात रुपये ३०/- वरुन रुपये ७८/- इतक्या दराप्रमाणे संस्था व्यवस्थापन समिती, औ.प्र.संस्था दोडामार्ग यांनी त्यांना प्राप्त अधिकारानुसार सीएमसी मार्फत प्रवेश प्रक्रिया पार पाडली आहे.

(३) राज्यातील खाजगी औ.प्र.संस्थांसाठी प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यासाठी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार प्रशिक्षण शुल्क वाढीसंदर्भात दिनांक १४.०५.२०१५ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसारच प्रशिक्षणार्थ्यांकडून शुल्क आकारण्यात आले आहे. तसेच प्रशिक्षणार्थींना लागू असलेले परीक्षा शुल्काचे दर हे १२ वर्षापूर्वीचे असून केंद्र शासनास प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ७५/- इतकी प्रतिपूर्ती करावयाची असल्याने परीक्षा शुल्कात वाढ करण्यात आली आहे. यामध्ये गैरव्यवहार झालेला नसल्याने तपास करण्यात आलेला नाही.

त्याचप्रमाणे मा.लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटना यांची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षणार्थ्यांकडून घेण्यात आलेले रुपये १०००/- इतके संस्था विकास शुल्क रद्द करुन सदर शुल्काची रक्कम प्रशिक्षणार्थींना परत करण्यासंबंधी शासनाने दिनांक ०५.११.२०१५ अन्वये आदेश निर्गमित केलेल आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण (जि.ठाणे) मधील एनआरसी कंपनीतील बडतर्फ करण्यात आलेल्या बारा कामगारांना सेवेत घेण्याबाबत

(४५) ४७१४६ (०७-०५-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) मधील एनआरसी कंपनीतील सात वर्षापूर्वी बडतर्फ करण्यात आलेल्या बारा कामगारांच्या बडतर्फीचे आदेश रद्द करत त्यांची बडतर्फ झाल्यापासूनची सेवा नियमित करुन सर्व देणी देण्याचे आदेश मा. कामगार न्यायालय ठाणे यांनी माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बडतर्फ कामगांराना कामावर घेण्यासाठी व प्रलंबित देणे देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१६-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

मा.कामगार न्यायालयाने युपीएल क्रमांक-१६१/२००८ प्रकरणी दिनांक १४/१२/२०१५ रोजी आदेश दिलेले आहेत.

(२) होय,

चौकशीअंती असे निदर्शनास आले आहे की, व्यवस्थापनाने मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे रिवीजन ॲप्लिकेशन युपीएल क्रमांक १२/२०१६ दाखल केले असून त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने दिनांक १४/१२/२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती द्यावी अशी विनंती केली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खाजगी आयटीआय मधील शिक्षकांना कर्नाटक व गुजरात राज्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत

(४६) ४७३८१ (१६-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील खाजगी आयटीआय मधील शिक्षकांना कर्नाटक व गुजरात राज्यापमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत दिनांक २१ जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने खाजगी आयटीआय मधील शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) शासन स्तरावरुन अशासकिय आय.टी.आय. संस्थांना कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येते. सदर मागणी धोरणात्मक स्वरुपाची असून याबाबत बैठका घेण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत यासंदर्भात शासन स्तरावरुन कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा जिल्ह्यातील चिखली नगर परिषद अंतर्गत संत रोहीदास नगर मधील एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेबाबत

(४७) ४९३३४ (०५-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील चिखली नगर परिषद अंतर्गत संत रोहीदास नगर सर्व्हे क्रमांक ९८ मधील या मागासवर्गीय प्रभागामध्ये एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत घरकुल योजनेला सन २०१२-१३ मध्ये मंजुरात मिळालेली असून निधी उपलब्ध आहे, सदर

जागेवरील असलेल्या आरक्षण काढण्याच्या संदर्भात नगर परिषदेने प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६) :(१), (२) व (३) आरक्षण क्र. ७२ व १७ वगळून त्याखालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकरिता नगरपरिषदेने (पत्र क्र. २२८३/२०१३) दि. २५/११/२०१३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. या प्रकरणी नगररचनाकार, बुलडाणा यांनी दि. १२/१२/२०१३ चे (पत्र क्र.फेरबदल/चिखली/आ.क्र.७२ व १७/नरबु/१७४८) अन्वये नगरपरिषदेकडून माहिती अपेक्षिलेली आहे. ती अद्याप नगरपरिषदेकडून प्राप्त झालेली नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था,सोलापूर येथे मागील ४ महिन्यापासून आय. टी. (माहिती तंत्रज्ञान) या ट्रेड चे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात नसल्याबाबत

(४८) ५००८८ (१६-०५-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे मागील ४ महिन्यापासून आय. टी. (माहिती तंत्रज्ञान) या ट्रेड चे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात नसून आता या विद्यार्थ्यांना विना प्रशिक्षण परीक्षेला सामोरे जावे लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षण उपलब्ध करून न दिल्याबद्दल संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, तसेच प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही किंवा उपाय योजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) संबंधितांना ज्ञापनाद्वारे समज दिलेली असून कामात सुधरणा न झाल्यास शिस्तभंगाची कार्यवाहीबाबत जाण्णिव करुन दिलेली आहे.

(३) सुधारित अभ्यासक्रमानुसार पात्र शिक्षकांची तात्पुरती नेमणूक करुन अभ्यासक्रम भरुन काढण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकामुळे पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणारे वर्ग बंद होणारअसल्याबाबत

(४९) ५२३४४ (१७-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून काढण्यात आलेल्या परिपत्रकामुळे राज्यातील ४१० शाळां पैकी २७६ शाळांमधील पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणारे वर्ग बंद होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत सदर अभ्यासक्रमाचे लाभ घेणारे ग्रामिण भागातील २५ हजारो विद्यार्थी कौशल्य विकासापासून वंचित राहणार असून, उक्त अभ्यासक्रम शिकविणारे तांत्रिक शिक्षकांवर बेकारीची व उपासमारीची वेळ येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने उपाययोजना करुन पर्यायी व्यवस्था करण्याची तांत्रिक मागणी शिक्षकांनी केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१६) :(१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील सुरक्षा रक्षक मंडळतील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते प्रलंबित असल्याबाबत

(५०) ५२७३३ (१९-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचा प्रलंबित असलेला वेतन व भत्ते वाढीचा प्रस्ताव तसेच १० टक्के घरभाडे मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे फेब्रुवारी २०१६ रोजी व त्यासुमारास मा.कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड वगळता मुंबई, ठाणे व पुणे जिल्ह्याकरिता सुरक्षा रक्षक मंडळांना एप्रिल २०१५ पासून वेतन व भत्ते वाढीचा प्रस्ताव मंजूर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षा रक्षकांना वेतन व भत्ते वाढीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत व १० टक्के घरभाडे मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१७-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कारण रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदित सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वाढ करुन घरभाडे भत्त्यात १०% वाढ केल्याबाबत दि.१०/५/२०१६ रोजी आदेश निर्गिमित केले असून सदरहू वाढ ही दि.१/१/२०१६ पासून पुढील ३ वर्षांसाठी देण्यात आलेली आहे. तसेच सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे अंतर्गत नोंदित सुरक्षा रक्षकांना दि.१५/११२०१५ रोजीच्या आदेशान्वये, दि.१/४/२०१५ पासून व पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदित सुरक्षा रक्षकांना दि.१७/५/२०१६ रोजीच्या आदेशान्वये दि.१/४/२०१६ पासून वेतनवाढ लागू केली आहे.

(३) वरीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.